# नगर परिषद कार्यालय,दिग्रस जि. यवतमाळ

जा.क्र./नपदि/पा.पु./५९८/२०२६

दिनांक :- २४/०४/२०२६

## -: ई निविदा सूचना (प्रथम वेळ) :-

### आरोग्य विभाग

मुख्याधिकारी दिग्रस जि. यवतमाळ यांचे वतीने ई - निविदा सूचना प्रसिध्द करण्यात येते कि ,नगर परिषद दिग्रस करिता सन २०२६-२०२७ या आर्थिक वर्षात कार्यादेशापासून ८ महिनेकारिता नागरी दलीतेत्तर वस्ती सुधार योजना सन २०२५-२६ अंतर्गत प्राप्त निधीतून दिग्रस शहराची घनकचरा व्यवस्थापनाची कामे करावयाची असून या कामाबाबत निविदेतील अटी व शर्तींची पुर्तता करू शकत असलेल्या कुठल्याही सक्षम कंत्राटदाराकडून दोन लिफाफा पद्धतीने ई- निविदा मागविण्यात येत आहे. सदर निविदेची सविस्तर माहिती http://mahatender.gov.in या संकेत स्थळावर दि. /०४/२०२६ पासून पहावयास उपलब्ध आहे.

| अ.क्र. | कामाचे विवरण | कामाची अंदाजपत्रकीय किंमत (रु.) | कोरे निविदा प्रपत्र किंमत (रु.) | अनामत रक्कम (रु.) | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | नागरी दलीतेत्तर वस्ती सुधार योजना सन २०२५-२६ अंतर्गत प्राप्त निधीतून नगर परिषद दिग्रस घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत दिग्रस हद्दीतील घरोघरी तसेच मोठ्या उत्पादकाकडील (दुकाने , हॉटेल , रेस्टोरंट, भाजीपाला विक्रेते इ.) ओला व सुका कचरा वेगळा करून संकलन व वाहतूक करणे तसेच नगर परिषदेने नेमून दिलेल्या क्षेपणभूमीवर पोहचवुन व्यवस्थापन करणे तसेच शहरातील नाले सफाई मधून निघणारा गाळ ,रस्ते सफाई मध्ये निघणारा कचरा क्षेपण भूमी पर्यंत वाहून नेणे. | १,०७,०९,१७६ /- | १५०००/- | १,१०,०००/- | कामाच्या आदेशापासून ८ महिन्यांकरिता |

## -: ई निविदा प्रक्रियेचा तपशील :-

| | |
|---|---|
| ई - निविदा online निविदा प्रसिध्दी व विक्री | दि.२७/०४/२०२६ पासून दि.२१ /०५/२०२६ दुपारी १.०० वाजेपर्यंत |
| ई - निविदा online सादर करणे तसेच निविदा फॉर्म व अनामत रक्कम online भरणे व निविदा online स्विकृती | दि.२७/०४/२०२६ पासून दि.२१ /०५/२०२६ दुपारी १.०० वाजेपर्यंत |
| online ई - निविदा तांत्रिक पडताळणी करणे | दि.२२/०५/२०२५ सकाळी १.०० वाजताच्या नंतर |
| निविदा पूर्व बैठक | दि.०५ /०५/२०२५ दुपारी १२.३० ते १:३० या कालावधी मध्ये |

आवश्यक तांत्रिक लिफाफा क्र.१ मध्ये सादर करावयाच्या दस्तएवजांचा तपशील :-

दाधारकाने संस्थेचे , कंपनीचे , फर्म, आस्थापणा ई. शासकीय संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र / परवाना
ापत्र निविदेसोबत सादर करावे .

व सेवा कर (GST) नोंदणी प्रमाणपत्र , पॅन कार्ड , आयकर प्रमाणपत्र मागील तीन वर्षांचे (सन
२-२०२३ , २०२३-२०२४ , २०२४-२०२५) .

. एफ. नोंदणी प्रमाणपत्र, किमान ५० कामगारांचे मागील बारा महिन्याची epf चालान भरणा
ती निविदेसोबत सादर करणे बंधनकारक राहील.

एस.आय.सी. प्रमाणपत्र किमान ५० कामगारांचे मागील बारा महिन्यांची चालान भरणा
ल्याबाबतची पावती निविदेसोबत सादर करणे बंधनकारक असेल.

बर वेलफेयर बाबत चालान भरणा करणे आवश्यक राहील , निविदे सोबत सन २०२५-२६ मधील
ालान भरणा केल्याची पावती निविदेसोबत सादर करणे बंधनकारक राहील.

ापूर्वी नगर परिषद / महानगर पालिका क्षेत्रामध्ये घनकचरा व्यवस्थापनाची निविदेतील नमूद कामे समाधानकारक रित्या/यशस्वीपणे केल्याबाबतचे आयुक्त/सहआयुक्त / उपायुक्त/ मुख्याधिकारी यांच्या स्वाक्षरीचे मागील तीन वर्षामध्ये (सन २०२२-२०२३,२०२३-२०२४,२०२४-२०२५) किमान पाच नगरपालिका , महानगरपालिका किंवा नगर पंचायती क्षेत्रामद्धे संमतुल्य स्वरूपाचे काम केल्याचा अनुभव असल्याबाबतचे अनुभव प्रमाणपत्र निविदेसोबत सादर करण्यात यावे.

एकल स्वरूपाच्या कामांचे अनुभव प्रमाणपत्रांचा जसे फक्त नाली सफाई करणे ,फक्त घनकचरा संकलन करून वाहतूक करणे , फक्त रस्ते सफाई करिता मनुष्यबळ पुरवठा करणे , फक्त शौचालय सफाई करिता मनुष्यबळ पुरवठा करणे , घनकचरा व्यवस्थापन व्यतिरिक इतर कामाकरिता फक्त मनुष्यबळ पुरवठा करणे ई. अशा प्रकारच्या फक्त एकल स्वरुपाच्या कामांबाबतचा अनुभवाचा निविदा तपासणी च्या वेळी विचार केला जाणार नाही याची संबंधित निविदाधारकांनी नोंद घावी.

निविदा भरतांना सादर करण्यात येणारे अनुभव प्रमाणपत्र हे या निविदेतील उल्लेखित कामांच्या अनुषंगाने एकत्रित स्वरुपाच्या कामाबाबत असणे आवश्यक आहे. कारण याद्वारे प्रसिद्ध करण्यात येणारी निविदा ही घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत एकत्रित कामासंबंधीची आहे. जसे घनकचरा संकलन व वाहतूक करणे , रस्ते सफाई , नाली सफाई ई. स्वच्छतेची अनुषंगिक कामे अशा कामांपैकी एकत्रित स्वरुपातील कामाच्या आदेशाच्या अनुषंगाने कामाच्या अनुभवाचा उल्लेख अनुभव प्रमाणपत्रामध्ये अनिवार्य आहे

- सक्षम चार्टर्ड अकाऊंटट यांनी प्रमाणित केलेले मागील तीन आर्थिक वर्षात ( सन २०२२-२०२३ , २०२३-२०२४ , २०२४-२०२५) केलेली कमीत कमी रु. ६ .०० कोटीची केलेली एकूण उलाढाल प्रमाणपत्र यूडीआयएन (UDIN) क्रमांक नमूद असलेले निविदेसोबत सादर करणे बंधनकारक राहील.
- निविदाधारकाकडे संस्था , कंपनी , फर्म, आस्थापणा ई. असल्यास मागील तीन आर्थिक वर्षात (सन २०२२-२०२३ , २०२३-२०२४ , २०२४-२०२५) संस्थेचे , कंपनीचे , फर्मचे,आस्थापनेचे ई. चे आर्थिक ताळेबंद सक्षम चार्टर्ड अकाऊंटट यांनी प्रमाणित केले असेलेले निविदेसोबत सादर करणे बंधनकारक राहील .
- निविदाधारकाने नमुना-अ रु. १००/- च्या मुद्रांकावर नगर परिषदेच्या नगर सेवक /पदाधिकारी यांचे सोबत काहीही हित संबंध, भागीदारी ,हिस्सा नसल्याबाबत प्रतिज्ञापत्र(नोटरी करून) ज्यामधे सदर निविदा सूचनेतील जे कामाचे नाव अंतर्भूत आहे त्या कामाचे नाव नमूद करून एका प्रती मध्ये निविदेसोबत सादर करणे बंधनकारक राहील .

- निविदेसोबत सादर करण्यात येणारे सर्व कागदपत्रे खरे व वैध असल्याबाबतचे तसेच कुठल्याही नगर परिषदेच्या /नगर पंचायतीच्या /महानगर पालिकेच्या काळ्या यादीत समाविष्ट नसल्याबाबतचे रु. ५००/- च्या मुद्रांक शुल्कावर प्रतिज्ञापत्र (नोटरी करून) ज्यामधे सदर निविदा सूचनेतील जे कामाचे नाव अंतर्भूत आहे त्या कामाचे नाव नमूद करून मूळ प्रत निविदेसोबत सादर करणे बंधनकारक आहे.
- रु. १,००,००,०००/- (रुपये एक कोटी ) ची राष्ट्रीयकृत बँकची वैध सॉलव्हन्शी निविदेसोबत जोडणे बंधनकारक आहे.
- मागील दोन वर्षाचे (२०२४-२०२५,२०२५-२०२६) PTEC व PTRC चालान भरणा पावती तसेच त्याचे क्लीअरन्स प्रमाणपत्र निविदेसोबत सादर करणे आवश्यक राहील.
- सध्यस्थितीत घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत कमीत कमी तीन नगर परिषद / नगर पंचायत मध्ये काम सुरु असल्याचे प्रमाणपत्र निविदेसोबत सादर करणे बंधनकारक असेल.
- किमान एक नगर परिषद / नगर पंचायत मध्ये काम करीत असतांना त्या नगर परिषद /नगर पंचायत ला हरित मानांकन प्राप्त झाल्याचे प्रमाणपत्र निविदे सोबत सादर करणे आवश्यक राहील.
- ऑनलाइन रित्या निविदा अनामत रक्कम व निविदा प्रपत्र रक्कम भरणा केल्याबाबतची पावती निविदेसोबत सादर करणे बंधनकारक आहे.
- दिग्रस शहरातील कचरा संकलन करून तो नगर परिषदेच्या क्षेपण भूमीवर वाहून नेणे बंधनकारक आहे. त्यामुळे सदर कामाकरिता इच्छुक निविदा धारक यांनी सदर क्षेपण भूमी येथे प्रत्यक्षरित्या जाऊन दिग्रस नगर परिषदेच्या क्षेपण भूमी येथे भेट देऊन त्याबाबत मुख्याधिकारी नगर परिषद दिग्रस यांनी प्रमाणित केलेले क्षेत्र भेट प्रमाणपत्र निविदा सोबत सादर करणे बंधनकारक असेल. क्षेपण भूमी येथील क्षेत्रभेट प्रमाणपत्र करिता आवेदन करतांना त्यासोबत भेटीचे GEO TAG छायाचित्र पुराव्यास्तव सादर करणे आवश्यक राहील त्याशिवाय क्षेत्रभेट प्रमाणपत्र भेटणार नाही याची इच्छुक निविदा धारक यांनी गांभीर्याने नोंद घ्यावी.
- जाइंट व्हेंचर सदर निविदा प्रक्रियेत भाग घेण्यास अपात्र राहतील ही अट समजूनच निविदा भरण्यात यावी.
- **निविदा सूचनेतील आर्थिक लिफाफ्यात १.०१ व १.०२ या मध्ये मनुष्यबळ पुरवठा करणे बाबत किमान वेतन अधिनियम नुसार किमान दर आहेत . त्यामुळे निविदा प्रक्रीये अंतर्गत आर्थिक लिफाफ्याततील १.०१ व १.०२ या ओळी मध्ये निविदा दर भरतांना त्यात निविदाधारकांनी त्यांचे सर्विस चार्जेस अंतर्भूत करून भरणे अभिप्रेत आहे.**

  **किमान वेतन अधिनियमानुसार सदर कामाचे अंदाजपत्रकातील मनुष्यबळ दराबाबत असलेल्या निर्धारित दराचे अनुषंगाने सदर निविदा प्रकिये अंतर्गत होणाऱ्या पात्र निविदा धारक यांस त्याचे मार्फत नियुक्त कुशल व अकुशल कर्मचारी यांना वेतन , epf भरणा , esic भरणा , बोनस ई. बाबतची अदागयी करणे बंधनकारक असेल हि अट समजूनच निविदा दर प्रस्तुत करावे. जर निविदा धारकामार्फत प्रस्तुत दर वरील प्रमाणे किमान वेतन अधिनियमनुसार आवश्यक किमान दर हे तफावतीने कमी असल्यास तो फरक संबंधित निविदाधारक यांना स्वखर्चातून त्यांचे मार्फत नियुक्त कर्मचारी यांना अदा करणे बंधनकारक राहील . असलेल्या फरकाच्या रकमेची अदागयी नगर परिषद दिग्रस मार्फत कुठल्याही परिस्थितीमध्ये होणार नाही याची संबंधित निविदा धारक यांनी निविदा दर भरतांना गांभीर्याने नोंद घ्यावी व हि अट समजूनच निविदा दर सादर करावे.**
- आर्थिक निविदा भरतांना ती आर्थिक निविदा लिफाफामध्येच भरण्यात यावी त्याचा कुठल्याही प्रकारचा उल्लेख तांत्रिक लिफाफ्यामध्ये येता कामा नये ही अट समजूनच निविदा भरतांना काळजी घ्यावी. अन्यथा

आपण प्रस्तुत केलेली निविदा रद्द करण्याचा अधिकार तसेच निविदेतील अटी व शर्ती वाढविणे अथवा कमी करणे बाबतचा अधिकार मुख्याधिकारी नगर परिषद दिग्रस यांना असेल.

जर पी.डी.एफ. स्वरूपातील निविदेसोबत सादर केलेली मूळ अभिलेखे कार्यालयाने मागणी केल्यास सादर करण्याची जबाबदारी संबंधित निविदाधारकाची असेल याची नोंद घ्यावी.

**अटी व शर्ती:-**

- सदर निविदा प्रक्रिया ई- निविदाद्वारे online पद्धतीने संगणकीय होईल , सदर निविदेसंदर्भातील निविदा प्रसिद्धी सूचना , अटी व शर्ती , शुद्धीपत्रक इत्यादीची माहिती http://mahatender.gov.in या संकेत स्थळावर दि. /०४/२०२६ पासून पहावयास उपलब्ध आहे.
- ऑनलाइन निविदा खरेदी करतांना अथवा भरतांना कोणत्याही कारणास्तव इंटरनेट , सर्व्हर , तांत्रिक ई. कारणामुळे अडथळा आल्यास नगर परिषद दिग्रस जबाबदार राहणार नाही. निविदा भरतांना सादर केलेल्या दस्तएवजांची हार्ड कॉपी एक प्रतीत निविदेच्या अंतिम तारखेनंतर २४ तासाच्या आत कार्यालयास सादर करावी लागेल.
- कामाचा आदेश प्राप्त झाल्यावर कामाकरिता नियुक्त करण्यात येणाऱ्या कर्मचाऱ्यांचा विमा कामाच्या विहित मुदतीकरिता या कार्यालयास वेळोवेळी सादर करणे आवश्यककाम करीत असतांना कोणत्याही शासकीय मालमत्तेचे नुकसान झाल्यास , कुठलाही अपघात, दुर्घटना वा हानी झाल्यास अथवा कोणाची /कामगाराची शारीरिक , मानसिक अथवा जीवहानी /दुर्घटना /अपघात झाल्यास त्यास सर्वस्वी संबंधित कंत्राटदार जबाबदार राहील. त्याबाबतचा कुठल्याही स्वरूपाचा मोबदला नगर परिषद दिग्रस कडून मिळणार नाही . तसेच वरील प्रकारच्या कुठल्याही नुकसान भरपाई करिता कंत्राटदारास नगर परिषद दिग्रस विरुद्ध कुठल्याही न्यायालयात दाद मागता येणार नाही याची सर्व निविदाधारकांनी नोंद घ्यावी.
- कोणत्याही परिस्थितीत कंत्राटदारास या निविदेतील कुठल्याही बाबीसाठी वाढीव दर मागण्याचा हक्क असणार नाही. निविदा मंजूरी नंतर कंत्राटदारास योग्य त्या मुद्रांक शुल्काच्या पेपर वर नगर परिषदेने विहित केलेल्या अटी व शर्ती विषयीचा कारनामा करवून देणे बंधनकारक असेल.
- कंत्राटदारास कुठल्याही परिस्थितीत मधेच काम सोडता येणार नाही. तसेच कुठल्याही प्रकारची लेखी पूर्वसूचना काम सोडायच्या किमान तीन महीने आधी नगर परिषद दिग्रस कार्यालयास न देता काम सोडल्यास मंजूर कंत्राट रद्द करून दुसऱ्या कंत्राट दारामार्फात काम करवयाचे झाल्यास निविदा दरातील फरकाची रक्कम हि संबंधित कंत्राटदाराच्या देय बिलातून , जमा असलेल्या सुरक्षा राशी व अनामत रक्कमेतून वसूल करण्यात येईल . तसेच सदर कंत्राटदाराचे नाव काळ्या यादीत समविष्ट करण्यात येईल , हि अट समजूनच निविदा दर सादर करावी .
- सशर्त निविदांचा विचार करण्यात येणार नाही , त्या आपोआप रद्द होतील. प्राप्त निविदांपैकी कोणतीही एक पात्र निविदा मंजूर करणे किंवा सर्व निविदा नामंजूर करण्याचा अधिकार मुख्याधिकारी दिग्रस नगर परिषद यांनी राखून ठेवलेला आहे.
- प्रत्येक महिन्याचे झालेल्या कामापोटी मंजूर निविदाधारका मार्फत प्रस्तुत देयक सोबत ज्या महिन्याचे देयक आहे त्या महिन्याच्या ईपीएफ व ईएसआयसी चालान भरणा बाबतची पावती सोबत जोडणे अनिवार्य राहील , त्याशिवाय देयक अदा केल्या जाणार नाही.
- सदर काम करीत असतांना मंजूर कंत्राटदार यांना त्यांचे मार्फत नियुक्त कर्मचारी यांना देयक प्रदाने महिना संपल्यावर पुढील महिन्याचे १० दिवसांचे आत करणे आवश्यक राहील. मंजूर कंत्राटदार यांचे मार्फत

नियुक्त कर्मचारी यांना वेतन प्रदाने त्यांना त्यांचे बँकेच्या खात्यामध्ये करणे अनिवार्य असेल व त्याबाबतच्या पुराव्याखातर नगर परिषद दिग्रसला प्रत्येक महिन्याचे देयकासोबत सादर करणे आवश्यक राहील .

- झालेल्या कामांचे मोबदल्यात सादर देयकातून नियमांनुसार सुरक्षा राशी , नियमानुसार आयकर , जी.एस.टी. कर , उपकर तसेच शासनाचे वेळोवेळी प्राप्त निर्देशांप्रमाणे कराची कपात करण्यात येईल. तसेच नगर परिषदेच्या निधीच्या उपलब्धतेनुसार देयकाचे प्रदान करण्यात येईल.
- नगर परिषदेच्या मालकीच्या वाहनावर वार्षिक १५% घसारा किंमत ( वाहनाचे मुळ किंमतीवर) हि मासिक देय देयकातून ने कपात करण्यात येईल. मंजूर कंत्राटदारास ज्या सुस्थितीत वाहने वापरावयास देण्यात आली आहेत त्या सुस्थितीतच परत काम संपल्यावर नगर परिषदेला हस्तांतरित करावी लागेल.सदर घनकचरा व्यवस्थापनाची कामे करण्याकरिता देण्यात आलेली वाहने जर नादुरुस्त अवस्थेत आढळल्यास संबंधित मंजूर कंत्राटदाराची अनामत, सुरक्षा रक्कम मधून वाहन दुरुस्तीची आवश्यक कामे पूर्ण करून झाल्यावरच त्याकरिता झालेला खर्च वगळता उर्वरित रक्कम (शिल्लक राहात असल्यास ) कंत्राटदारास अदा करण्यात येईल .
- सदरहू घनकचरा व्यवस्थापनाचे कामाचे अनुषंगाने काढण्यात येत असून कंत्राटदारामार्फत लावण्यात येणाऱ्या मनुष्यबळद्वारे शहरातील सर्व १०० % मालमत्ता मधील द्वारस्तरांवरचा वर्गीकृत (ओला,सुका ,घातक ई.) १००% घनकचरा बंदिस्त वाहनाद्वारे गोळा करून वाहतूक करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील . तसेच कंत्राटदारामार्फत नाल्यातील काढलेला गाळ उचलून क्षेपण भूमी पर्यंत वाहून नेणे , रस्ते सफाई चा कचरा क्षेपण भूमी पर्यंत वाहून नेणे ची घनकचरा व्यवस्थापण अंतर्गत दैनंदिन कामे आवश्यकतेनुसार करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची असेल.
- दिग्रस नगर परिषद हद्दीमध्ये ICT BASED प्रणाली अंतर्गत बसविण्यात आलेल्या शहरातील मालमत्तावर , नाल्यांचे ठिकाणी , रस्त्यांचे ठिकाणी बसविण्यात आलेल्या QR CODE ची नियमितपणे SCANNING करण्याची जबाबदारी मंजूर कंत्राटदार यांचे मार्फत होणे बंधनकारक राहील.प्रत्येक महिन्याचे अखेरीस त्याबाबतचा अहवाल नगर परिषद मार्फत तपासण्यात येईल व तो अहवाल समाधानकारक असणे आबश्यक असेल. नाहीतर त्याचा परिणाम देयक अदागयीवर होईल याची गांभीर्याने नोंद घ्यावी.
- स्वच्छ भारत अभियान अंतर्गत दिग्रस शहरास किमान ३ तारांकित मानांकन (थ्री स्टार रेटिंग) मिळणेबाबत आवश्यक असलेली आनुषंगिक कामे मा.मुख्याधिकारी तथा आरोग्य विभाग अभियंता ,स्वच्छता निरीक्षक यांचे वेळोवेळी प्राप्त निर्देशानुसार करण्याची जबाबदारी मंजूर कंत्राटदाराची असेल.
- मा. हरित लवाद यांचे निर्देशांचे व वेळोवेळी महाराष्ट्र प्रदूषण महामंडळ कडून येणाऱ्या परिपत्रकांचे पालन घनकचरा व्यवस्थापनाचे काम करीत असतांना कुठेही जमीन , वायू, जल प्रदूषण वा पर्यावरणाचा ऱ्हास होणार नाही याची जबाबदरी संबंधित कंत्राटदाराची असेल. या अटीचे उल्लंघन झाल्यास आपण नियमांनुसार दंडास पात्र राहाल व ती दंडाची रक्कम आपले देयकातून कपात करण्यात येईल.
- कंत्राटदराने दिग्रस नगर परिषद हद्दीतील घरोघरी तसेच मोठ्या कचरा उत्पादकाकडील( दुकाने , हॉटेल्स, मंगल कार्यालये खानावळी,भाजीपाला विक्रेते , व्यापारीई.) ओला व सुका कचरा वर्गीकरण करून १००% संकलन करणे व त्याची वर्गीकृत स्वरुपात वाहतूक करणे बंधनकारक असेल.
- रस्ता सफाई मध्ये निघालेला कचरा , नाले सफाई तील निघालेला गाळ , कचरा कुंडीतील व सार्वजनिक ठिकाणी असलेला कचरा विलगीकृत स्वरुपात संकलन करून बंदिस्त स्वरुपात वाहतूक करणे बंधनकारक असेल.
- कंत्राटदारास घनकचरा व्यवस्थापन नियम २००० व २०१६ मधील आवश्यक त्या तरतुदी तसेच नगर परिषद दिग्रस उपविधीतील सर्व अटींचे व शर्तींचे पालन करणे बंधनकारक राहील.

- द्वारस्त्तरावरून गोळा करण्यात येणारा कचरा कंत्राटदारांना बंदिस्त वाहनाने स्वतंत्र कप्प्यात ओला , सुका व घातक कचरा याप्रमाणे संकलन करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील . यासाठी संबंधित रहिवाशी , घरमालक, भोगवटदार , व्यावसायिक , गृह निर्माण संस्था , विक्रेते ,कार्यालये , रुग्णालये, शाळा, महाविद्यालये ई. यांना वेळोवेळी आवश्यकतेनुसार सूचना , मार्गदर्शन , जनजागृती , नागरिकांचे प्रबोधन करून वर्गीकृत कचरा संकलनाची पूर्तता करण्याची जबाबदारी ही कंत्राटदाराची असेल.
- संकलित होणाऱ्या घनकचरा पैकी विघटनशील सेंद्रिय पदार्थांपासून शक्य असलेल्या ठिकाणीच खत निर्मिती साठी नागरिकांमध्ये जनजागृती करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची असेल.
- कंत्राटदाराकडील घनकचरा व्यवस्थापनासाठी वापरात असलेली वाहने यांची नियमित देखभाल व दुरुस्ती कंत्राटदराने आवश्यकतेनुसार करणे आवश्यक आहे. एखादे वेळेस वापरात असलेल्या वाहनापैकी एखादे वाहन नादुरुस्त झाल्यास ते दुरुस्त होईपर्यंत त्या एवजी पर्यायी व्यवस्था करून काम सुरु ठेवणे बंधनकारक असेल. तसेच वाहन दुरुस्तीबाबत वेळोवेळी केलेल्या खर्चाबाबतची देयके कार्यालयास सादर करणे बंधनकारक असेल .
- घनकचरा बंदिस्त वाहनाने वाहतुकीच्या वेळी कचरा /घाण रस्त्यावर सांडणार नाही याची खबरदारी कंत्राटदराने घेणे आवश्यक असेल. सदर अटीचे पालन न झाल्यास मासिक देयकातून प्रती खेप रु. १०००/- प्रमाणे दंड आकरण्यात येईल.
- वरीलप्रमाणे नमूद कामाची मुदत हि कामाच्या आदेशापासून ८ महिनाकरिता असून सदर घनकचरा व्यवस्थापनाचे काम विनाखंड चालू ठेवणे कंत्राटदारास बंधनकारक राहील.घनकचरा संकलन , वाहतूक व व्यस्थापन चे काम हे शासकीय सुट्टीच्या दिवशीसुद्धा सुरु ठेवावे लागेल . काही अपिरीहार्य कारणास्तव कंत्राटदाराकडील यंत्रणा बंद ठेवणे जरुरीचे झाल्यास नगर परिषदेस घनकचरा संकलनासाठी पर्यायी व्यवस्था करून देणे बंधनकारक असेल.
- घनकचरा व्यवस्थापन संकलन ,वाहतूक व व्यवस्थापनाचे काम विना परवानगीने बंद राहिल्यास प्रती दिन रु.१०,०००/- प्रमाणे दंडाची रक्कम देय असलेल्या देयकातून वसूल करण्यात येईल . तसेच कामाबद्दल काही लेखी तक्रारी प्राप्त झाल्यास व त्या तक्रारीचे निरसन २४ तासांचे आत न झाल्यास प्रती दिन प्रती तक्रार रु. १०००/- प्रमाणे दंड आकारण्याचा अधिकार मुख्याधिकारी नगर परिषद दिग्रस यांना असेल. तसेच दैनंदिन रित्या घंटा गाड्यांमार्फत कचरा वर्गीकृत स्वरुपात गोळा न केल्यास प्रती ट्रीप प्रमाणे रु. ५०००/- दंड आकरण्यात येईल याची निविदा धारकांनी नोंद घ्यावी.
- कंत्राटदारास प्रत्येक वाहना करिता स्वत्रंत जीपीएस प्रणाली चा मासिक अहवाल प्रत्येक महिन्याच्या शेवटच्या तारखेस आरोग्य विभागाकडे देयकासोबत सादर करणे बंधनकारक असेल . सदर घंटा गाडी व tractor ला जीपीएस यंत्रणा बसविण्याची जबाबदारी मंजूर कंत्राटदाराची असेल. तसेच दैनंदिन रित्या कामावर नियुक्त करण्यात आलेल्या कामगारांची दैनंदिन हजेरी पुस्तिका स्वच्छता निरीक्षक यांनी प्रमाणित करवून दिलेली प्रत्येक महिन्याचे देयकसोबत सादर करणे आवश्यक असेल. अशा प्रकारे नोंदी घेतलेल्या प्रस्तुत अभिलेख्याची पडताळणी करूनच संबंधित कंत्राटदाराचे देयकाची अदागयी करण्यात येईल .
- कंत्राटदराने कामगार विषयक कंत्राटी कामगार ( नियमन व निर्मुलन ) अधिनियम १९७० , किमान वेतन कायदा १९४८ , वेतन प्रदान १९३६ , बालकामगार (प्रतिबंध व निर्मुलन ) अधिनियम १९८६ व अन्य कायद्याचे तसेच ई.पी.ईफ. कायदा १९५२ अन्वये पालन करणे त्याप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करण्याची जबाबदारी मंजूर कंत्राटदाराची राहील.
- कंत्राटदराने त्याचे अधिनस्त कंत्राटी कामगारांना हातमोजे , गमबूट ,रेनकोट , मास्क ,जॅकेट ,स्यानिटायजर , पी.पी.इ. किट , चष्मे ई. सुरक्षा साहित्य तसेच ओळखपत्र स्वतःचे खर्चाने आवश्यकतेनुसार देणे बंधनककारक राहील.

- सुरक्षा राशी ही देय मासिक देयकातून नियमानुसार कपात करण्यात येईल . कामाचा कालावधी संपल्यानंतर कंत्राटदाराकडून नगर परिषदेला कोणतीही नुकसान भरपाई म्हणून घेणे नाही या बाबतची खातरजमा झाल्यावर जमा असलेली सुरक्षा राशी कामाचा कालावधी समाप्त केल्यानंतर परत करण्यात येईल. कामास मुदत वाढ देण्याचा अधिकार हा नगर परिषद दिग्रस चा राहील तो कंत्राटदाराचा अधिकार राहणार नाही. तसेच सदरहू हे काम नागरी दलीतेतर योजना २०२५-२०२६ अंतर्गत मंजूर असून निधीच्या उपलब्धतेनुसार देयकाचे प्रदान करण्यात येईल.
- निविदा धारकास कंत्राटी कामगारांना किमान वेतन कायद्यानुसार वेतन देणे बंधनकारक आहे, तसेच त्या बाबतच्या नोंदी प्रत्येक महिन्यास आरोग्य विभाग कार्यालयास सादर करणे आवश्यक असेल. कंत्राटी कामगारांनी नियमबाह्य वर्तन केल्यास त्याला कामावरून त्वरित काढण्यात येऊन पर्यायी कंत्राटी कामगाराची व्यवस्था कंत्राटदारास करावी लागेल. कामावर कुठलाही बाल कामगार ठेऊ नये .
- घनकचरा संकलन , वाहतूक व व्यवस्थापनाचे काम करीत असतांना आवश्यक ती मशिनरीज (jcb) , वाहन व साहित्याची व्यवस्था स्वतःच्या खर्चाने कंत्राटदारास करावी लागेल . तसेच उरलेले बांधकाम साहित्य व बांधकामांचे भग्नाशेष ची वाहतुक करणे कंत्राटदारास बंधनकारक राहील , त्याकरिता आवश्यक उपाययोजना कंत्राटदारास कराव्या लागतील.
- शहरात वेळोवेळी आयोजित होणार्या धार्मिक उत्सव , यात्रा , शासकीय समारंभ , प्रदर्शनी , शिबिरे , प्रभातफेरी , जुलूस , मोर्चा ई. कार्यक्रमाचे ठिकाणी निर्माण होणारा घनकचरा बंदिस्त वाहनाद्वारे संकलित करून त्याची वाहतूक करणे बंधनकारक असेल व आवश्यक त्यावेळी निर्धारित दैनंदिन वेळेपेक्षा जादा कामे करावी लागतील याची नोंद घ्यावी.
- मा. जिल्हाधिकारी , यवतमाळ यांच्या प्रशासकीय मंजुरी आदेशामधील व मा. अधीक्षक अभियंता , म.जी.प्रा. , मंडळ अमरावती यांच्या तांत्रिक मंजुरी आदेशामधील सर्व अटी व शर्ती निविदा धारकास पालन करणे बंधनकारक राहील.
- आपतकालीन परिस्थितीमध्ये जनतेच्या हितार्थ मुख्याधिकारी यांनी दिलेल्या आदेशाचे पालन करावे लागेल.
- १) दिनांक २७/०९/२०१८ च्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र.४.६.३ (ब) मध्ये नमूद " देकार १५% पेक्षा कमी दराचा असल्यास उर्वरित रकमेसाठी दोन पटीने रक्कम डीडी द्वारे सादर करणे अनिवार्य राहील उदा. १९% कमी दराकरिता (१९-१५=४)% * २ = ८% ) असे सूत्र असयाचे .

  **ऐवजी**

  २) देकार १५% पेक्षा कमी दराचा असल्यास उर्वरित रकमेसाठी दोन पतीने रक्कम डीडी द्वारे सादर करणे अनिवार्य राहील व त्याचे % पुढील प्रमाणे काढण्यात यावे. उदा. १९% कमी दारासाठी पुढील प्रमाणे पृथक्करण > १०% कमी दरापर्यंत १% व १०% ते १५ % साठी (१५%-१०%=५%) तसेच १५% ते १९% करिता (१९%-१५% = ४% *२ = ८%) असे सांगता येईल . एकत्रित उर्वरित रक्कम १९% कमी दरासाठी ( १% +५% +८% = १४%) असे राहील.

  बाब क्र. २ प्रमाणे येणाऱ्या रकमेसह एकत्रित धनाकर्ष द्वारे( demand draft) सादर करणे बंधनकारक राहील.

- वरील अटी व शर्ती व्यतिरिक्त कुठलीही अट काढणे अथवा वाढविणे याचा अधिकार मुख्याधिकारी, नगर परिषद दिग्रस यांनी राखून ठेवलेला आहे.

मी / आम्ही निविदेतील संपूर्ण अटी व शर्तीचे वाचन केले असून संपूर्ण अटी व शर्ती मला / आम्हाला मान्य आहेत. तसेच दिग्रस शहराचे संपूर्ण प्रत्यक्षरीत्या सर्वेक्षण करून मी / आम्ही कामाचे स्वरूप समजून

घेतले आहे व ते मला /आम्हाला पूर्णपणे अवगत असून मला / आम्हाला मान्य आहे व या सर्व बाबींच्या अधीन राहून मी / आम्ही निविदा दरपत्रक भरण्यास तयार आहे/आहोत .

( निविदा धारकाचे नाव/सही)

मुख्याधिकारी
नगर परिषद , दिग्रस

Signature Not Verified
Digitally signed by Akshay Dhansing Rathod
Date: 2026.04.27 16:49:41 IST
Location: Maharashtra-MH